प्रा. डी. जी. चिघळीकर (03)

ISSN 2454-3292

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# INDO WESTERN RESEARCH JOURNAL

(UGC Approved, Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year-VI, Issue - XI, Vol.-IV

Impact Factor 6.10 (GRIFI)

Sept. 2019 To Feb. 2020

2019-20

Peer-Reviewed (24)

IAP
INDO ASIAN PUBLICATION

EDITOR IN CHIEF

Prof. Dnyanraja Chighalikar

| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 15 | कोल्हापूर जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या समस्या<br>**डी.जी. चिघळीकर, डॉ. एल.एच. पाटील** | 67 |
| 16 | महाविद्यालयीन शिक्षक-प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या मान्यताप्राप्त रजांच्या अद्यावत तरतूदी<br>**राजेंद्र आप्पासाहेब तराळ** | 72 |
| 17 | विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या २० वर्षातील कार्याचा आढावा<br>**गौतम गणपती काटकर** | 81 |
| 18 | शासनाच्या निर्मल ग्राम योजनेच्या अनुषंगाने नेसरी ग्रामपंचायतीची दिशा<br>**जे.के. ससाने** | 87 |
| 19 | कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाचे योगदान (इ.स. १९६२ ते २००२)<br>**तुकाराम महादेव पाटील** | 94 |
| 20 | संविधानिक नैतिकतेलाच आव्हान<br>**डॉ. आण्णासाहेब हरदारे** | 99 |
| 21 | आजची तरुणाई आणि सोशल मिडीया - एक सामाजिक समस्या<br>**अजिंक्य दत्तात्रय पाटील** | 103 |
| 22 | ऐतिहासिक दृष्टिकोनातून पर्यटन<br>**डॉ. संजय हणमंत भोसले** | 106 |

IMPACT FACTOR 6.10
ISSN 2454-3292
Indo Western Research Journal (IWRJ)
Issue : XI, Vol. : IV
Sept. 2019 To Feb. 2020
www.irasg.com

Research Paper 15

# कोल्हापूर जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या समस्या

**डी.जी. चिघळीकर**
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

**डॉ. एल.एच. पाटील**
शिवाजी महाविद्यालय,
उदगीर, जि. लातूर

**प्रस्तावना:**

शेती हा जसा देशाच्या अर्थव्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. तसाच तो राज्याच्या आणि कोल्हापूर जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेतील ही अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. देशातील एकूण शेतकरी कुटुंबापैकी ८४.९ टक्के शेतकरी कुटुंबे ही अल्पभूधारक आहेत. कृषी गणना २०१०–११ नुसार राज्यातील ७८.६ टक्के वहीती खतेदार हे अल्पभूधारक आहेत. कोल्हापूर जिल्ह्याचा विचार करता एकूण वहिती धारक शेतकऱ्यांपैकी अल्पभूधारक वहीती धारकांची एकूण संख्या ६२१६०८ इतकी प्रचंड मोठी असून त्यांनी एकूण शेतजमीनी पैकी ३९३६४३.५६ इतके क्षेत्र धारण केलेले आहे. यावरून एक गोष्ट लक्षात यते की, जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या मोठी असून जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेत हा वर्ग अत्यंत महत्त्वाचा आहे. तसेच त्यांच्या समोरील समस्यांची यादीही मोठी आहे. कायमच या वर्गाची शासन व प्रशासन स्तरावरून उपेक्षा झालेली आहे. परिणामी या वर्गाच्या हालाखीत वाढ झालेली आहे. म्हणून अशा उपेक्षित वंचित अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या समस्यां सदर शोधनिबंधाच्या माध्यमातून समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेली आहे

**शोधनिबंधाचा उददेश :**

अल्पभूधारक शेतक–यांच्या समस्यां समजून घेवून त्यावर उपाय सूचवणे.

**शोधनिबंधाचे गृहीतक :**

कोल्हापूर जिल्यात अल्पभूधारक शेतक–यांची संख्या मोठी आहे. अल्पभूधारक शेतकरी समस्याग्रस्त असून त्यांच्या समस्यामध्ये सातत्याने वाढ होत आहे.

**संशोधन पध्दती:**

कोल्हापूर जिल्हयातील अल्पभूधारक शेतक–यांच्या समस्या हा शोधनिबंध माहितीच्या द्वितीय साधन सामुग्रीवर आधारीत आहे. द्वितीय साधन सामग्रीमध्ये शोधप्रबंध, संदर्भग्रंथ, शासकीय व अशासकीय अहवाल, मासिके, वर्तमानपत्रे आणि विविध वेबसाईट वरील उपलब्ध माहीतीचा आधार घेतला गेला आहे.

**शोधनिबंधाची मर्यादा :**

कोल्हापूर जिल्हयातील फक्त पाच एकर व त्यापेक्षा कमी शेतजमीन नावावर असणा–या आणि प्रत्यक्षात शेतजमीन कसणा–या शेतक–यांच्या सन १९९४ – ९५ ते २०१४ – १५ याच कालखंडातील समस्यांची माहिती घेतली गेली आहे.

**कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे धारणक्षेत्र :**

कोल्हापूर जिल्हा हा शेतकऱ्यांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे वर्गीकरण वहिती धारणेचा प्रकार आणि क्षेत्रफळ गटानुसार करण्यात आलेले आहे. जिल्ह्यातील एकूण वैयक्तिक धारण संख्या ६२७७४२ इतकी असून त्यांनी धारण केलेले क्षेत्रफळ ४४८६३८.०८ इतके आहे.

वैयक्तिक धारण अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या ६२१६०८ इतकी प्रचंड मोठी असून, त्यांनी धारण केलेले एकूण धारणक्षेत्र ३९३६४३.५६ इतके आहे. एकूण संयुक्त ध ारण संख्या ७२५३ इतकी असून क्षेत्रफळ ४९२९.१७ इतके आहे. एकूण संस्था धारण संख्या ३२८९ तर क्षेत्रफळ ४२२७.२७ इतके आहे. अशा प्रकारे जिल्ह्यातील एकूण धारण संख्या ही ६३८२८४ इतकी तर धारण क्षेत्रफळ ४५७७९४.८६ इतके आहे.

**अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या समस्या :**

शेती आणि शेतकरी हाच आज सर्वात जास्त समस्याग्रस्त आहे. शेतीचे निसर्गावरील अवलंबित्व, निसर्ग चक्रामध्ये वारंवार अचानकपणे होणारे बदल, यामुळे शेती आणि शेतकऱ्यांच्या समोरील समस्यांमध्ये दिवसें–दिवस वाढ होत आहे. अल्पभूधारक शेतकरी कुटुंबासमोरील समस्यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करण्यात आलेले आहे.

तक्ता क्र. १

| अ. क्र. | समस्यांचा तपशील | १९९४–९५ | | २०१४–१५ | |
|---|---|---|---|---|---|
| | | कुटुंब संख्या | प्रतिशत प्रमाण | कुटुंब संख्या | प्रतिशत प्रमाण |
| १ | पावसाची अनियमितता | ४५८ | ७६.३ | ५५५ | ९२.५ |
| २ | हवामानातील बदल | ३४० | ५६.७ | ५११ | ८५.२ |
| ३ | किड व रोगांचा प्रादुर्भाव | ३१६ | ५२.७ | ५२२ | ८७.० |
| ४ | क्षारपड जमीन | १९ | ३.२ | १८० | ३०.० |
| ५ | अल्प उत्पादकता | १२० | २० | ३०६ | ५१.० |
| ६ | वाढत जाणारा उत्पादन खर्च | १५८ | २६.३ | ४०० | ६६.७ |
| ७ | शेतमजुरांचा तुटवडा | १४६ | २४.३ | ३२७ | ५४.५ |
| ८ | शेतमाल किंमत | २३६ | ३९.३ | ३९६ | ६६.० |
| ९ | शेतमाल वाहतुक | १३३ | २२.२ | २२८ | ३८.० |
| १० | योग्य माहितीचा अभाव | ६१ | १०.२ | ९४ | १५.७ |
| ११ | शासकीय अधिकाऱ्यांकडून होणारी अडवणूक | २४ | ४.० | ७८ | १३.० |
| १२ | वेळेवर कर्ज उपलब्ध न होणे | ४० | ६.७ | ४० | ६.७ |
| १३ | जंगली प्राण्याचा उपद्रव | ३६ | ६.० | ७१ | ११.८ |
| १४ | इतर | ०९ | १.५ | १२ | २.० |

**स्त्रोत:** ज्ञानराजा चिघळीकर, २०१९, कोल्हापूर जिल्यातील अल्पभूधारक शेतक–यांची सामाजिक आर्थिक स्थिती: एक चिकित्सक अभ्यास, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास सादर केलेला संशोधन प्रबंध. पृष्ठ क्र. २७८

वरील तक्यात दाखवल्या प्रमाणे पावसाची अनियमितता, हवामानातील बदल, किड व रोगांचा प्रार्दुभाव, क्षारपड जमीन, अल्प उत्पादकता, वाढत जाणारा उत्पादन खर्च, शेत मजूरांचा तुटवडा, शेतमाल किंमत, शेतमाल वाहतूक, योग्य माहितीचा अभाव, शासकीय अधिका–याकडून होणारी अडवणूक, वेळेवर कर्ज उपलब्ध न होणे, जंगली प्राण्यांचा उपद्रव व इतर समस्यांच्या माहिती वरून असे लक्षात येते की, १९९४ –९५ तुलनेत २०१४ –१५ मध्ये समस्यामध्ये घट होण्या ऐवजी वाढ झालेली दिसून येते.

**निष्कर्ष :**

१९९४–९५ मध्ये ७६.३ टक्के शेतकऱ्यांना पावसाची अनियमितता ही समस्या वाटते. सन २०१४–१५ मध्ये यात वाढ झालेली असून ९२.५ टक्के शेतकरी म्हणतात की पावसाची अनियमितता ही मुख्य समस्या आहे.

१९९४–९५ मध्ये ५६.७ टक्के शेतकऱ्यांना हवामान बदलाची समस्या भेडसावते तर २०१४–१५ मध्ये ही संख्या ८५.२ टक्के इतकी मोठी आहे.

१९९४–१५ मध्ये ५२.७ शेतकऱ्यांना किड व रोगांचा प्रादुर्भाव ही समस्या भेडसावत होती, त्यात आता वाढ झालेली असून ८७.० टक्के शेतकऱ्यांना किड व रोगांचा प्रादुर्भाव ही समस्या भेडसावते.

क्षारपड जमिनीच्या प्रमाणात ही वाढ झालेली दिसते. १९९४–९५ मध्ये ३.२ टक्के

शेतकऱ्यांसमोर ही समस्या होती. तर २०१४–१५ मध्ये त्यात ३०.० टक्के इतकी वाढ झालेली आहे.

१९९४–९५ मध्ये २० टक्के शेतकऱ्यांना अल्प उत्पादकतेची समस्या होती. त्यातही वाढ झालेली असून, आता ५१.० टक्के शेतकऱ्यांची समस्या बनलेली आहे.

उत्पादन खर्चातही दिवसेंदिवस वाढ झालेली आहे. १९९४–९५ मध्ये २६.३ टक्के शेतकऱ्यांना वाढत जाणाऱ्या उत्पादन खर्चाची समस्या होती. आता ६६.७ टक्के शेतकऱ्यांची समस्या बनली आहे.

एकीकडे शेतीत यांत्रीकीकरणाचा वापर वाढलेला असला तरी शेतमजुरांचा तुटवडा ही मोठ्या प्रमाणात निर्माण झाला आहे. सन १९९४–९५ मध्ये २४.३ टक्के शेतकऱ्यांसमोर शेतमजूरांच्या तुटवड्याची समस्या होती. आता ५४.५ टक्के शेतकऱ्यांसमोर ही समस्या आहे.

शेतकऱ्यांची गेल्या अनेक वर्षापासूनची मागणी आहे की, शेतमालाला योग्य किंमत मिळाली पाहिजे. परंतु ती अद्यापही मिळत नाही. १९९४–९५ मध्ये ३९.३ टक्के शेतकऱ्यांना ही समस्या वाटत होती. आता मात्र ६६.० टक्के शेतकऱ्यांना ही समस्या वाटते.

१९९४–९५ मध्ये २२.२ टक्के शेतकऱ्यांना शेतमाल वहातूकीची समस्या होती, तर २०१४–१५ मध्ये ३८.० टक्के शेतकऱ्यांना ही समस्या आहे.

शेतकऱ्यांना योग्य माहितीचा अभाव ही सुध्दा एक महत्वाची समस्या आहे. सन १९९४ – ९५ मध्ये १०.२ टक्के तर सन २०१४ –१५ मध्ये १५.७ टक्के शेतकरी म्हणतात की योग्य माहितीचा अभाव ही समस्या आहे

शासकीय अधिकाऱ्यांकडून होणारी शेतकऱ्यांची अडवणूक सुद्धा एक महत्वाची समस्या आहे. सन १९९४ –९५ मध्ये ४.० टक्के तर २०१४–१५ मध्ये १३.० टक्के शेतकरी म्हणतात की ही समस्या आहे.

तसेच वेळेवर कर्ज उपलब्ध न होणे ही समस्या सन १९९४ –९५ व २०१४ –१५ या वर्षात ६.७ टक्के इतकी कायम आहे. जंगली प्राण्यांचा उपद्रव ही समस्या सन १९९५ – ९५ मध्ये ६.० टक्के तर २०१४ –१५ मध्ये ११.८ टक्के शेतक–यांना होती. या बरोबरच वरील समस्या व्यातीरीक्त इतर समस्यांचा विचार करता सन १९९४ –९५ मध्ये १.५ टक्के तर सन २०१४ –१५ मध्ये २.० टक्के शेतकऱ्यांना इतर समस्या आहेत असे वाटते.

**शिफारशी:**

अशा प्रकारे कोल्हापूर जिल्यातील अल्पभूधारक शेतक–यांच्या वाढत जाणा–या समस्यावर मात करण्यासाठी शासकीय स्तरावरून व्यापक प्रयत्न करण्याची गरज आहे. नैसर्गिक स्वरूपाच्या समस्यामूळे होणा–या आर्थिक नुकसानीची भरपाई वेळेत व पूरेशा प्रमाणात करण्यात यावी.

शेतक–यांचा वाढत जाणारा उत्पादन खर्च कमीत कमी करण्याच्या दुष्टीने कृषी आदानाचा पुरवठा अत्यंत कमी किंमतीला करण्यात यावा.

शेतक–यांच्या उत्पादन खर्चावर आधारित दराची हमी दयावी. शासकीय अधिका–याकडून शेतक–यांची होणारी अडवणूक थांबवण्यात यावी. अडवणूक करणा–या अधिका–याना शिक्षेची तरतुद करावी.

शेतमाल वाहतूकीसाठी सुविधा उपलब्ध कराव्यात. वेळेवर व कमीत कमी व्याज दाराने कर्ज पुरवठा करण्यात यावा शेतमजूरांच्या समस्येवर मात करण्यासाठी शेतक–यांना अत्याधूनिक यंत्र तंत्रज्ञनाचा पुरवठा अनुदानावर करण्यात यावा. जंगली प्राण्यांचा उपद्रव थांबवण्यासाठी वन विभागाने प्रयत्न करावेत व होणा–या नुकसानीची भरपाई दयावी. शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी व्यापक प्रयत्न करावे लागतील.

शेतीमधील सरकारी गुंतवणूक मोठया प्रमाणात वाढवली तर निश्चितपणे अल्पभूधारक शेतक–यांच्या वाढत जाणा–या समस्या निश्चितपणे दुर करता येतील.

## संदर्भ सुची :-


१ जिल्हा साामजिक व आर्थिक समालोचन–२०१४, २०१५, २०१६, २०१७ कोल्हापूर जिल्हा अर्थ व सांख्यीकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन वांद्रे पुर्व मुंबई.

२ ज्ञानराजा चिघळीकर, २०१९, कोल्हापूर जिल्यातील अल्पभूधारक शेतक–यांची सामाजिक आर्थिक स्थिती: एक चिकित्सक अभ्यास, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास सादर केलेला संशोधन प्रबंध.

३ तुपे संदिप काकासाहेब, २०१३, 'सिमांत व अल्पभूधारक शेतकरी यांच्या सामजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन: विशेष संदर्भ औरंगाबाद जिल्हा', पीएच.डी प्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद (महाराष्ट्र).

४ कि. का. चौधरी, १९८९, 'महाराष्ट्र राज्य गॅझेटियर', कोल्हापूर जिल्हा दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई